सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo.86868 88898




बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - ३२५ | रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 325 | SUNDAY, DT.30 NOVEMBER 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# गर्दीतल्या आमदाराची सत्ताधाऱ्यांना भीती !

## जातीयवादी पक्षांना रोखण्यासाठी संदीप भैय्या, सलीम भाईंची जोडी ठरणार नंबर वन !

### बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांना रोखण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्र्यांची धडपड

- **आ. संदीप क्षीरसागर मास्टरप्लॅनने सत्ताधाऱ्यांना जनतेच्या बळावर चितपट करणार!**
- **फौज तुमच्याकडे, रणनीती आमच्याकडे! 'जकडलेला' एक आमदार, संपूर्ण सत्ताधाऱ्यांवर भारी**
- **मुस्लिम, दलित, मराठा, ओबीसींनी आवळली वज्रमुठ !**
- **कोणाचाही करा पण संदीप भैय्याचा नाद करायचा नाय..**
- **अठरा पगड समाजाला सोबत घेऊन चालणारा एकमेव आमदार म्हणजे संदीप क्षीरसागर**



विश्वनायक न्यूज

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अजून दोन दिवस शिल्लक आहेत आणि बीड शहरातील राजकारण अक्षरशः पेटलेले आहे. चार कोपऱ्यातून चार पक्ष. शरद पवारांची राष्ट्रवादी, अजित पवारांची राष्ट्रवादी, भाजप आणि एमआयएम मैदानात उतरले असले तरी सर्वांच्या डोळ्यात खरा काटा ठरले आहेत ते बीडचे आमदार संदीप क्षीरसागर!बीडमध्ये क्षीरसागरांचे वर्चस्व हे 'गर्दीतला राजा' अशी ओळख निर्माण करणारे आहे. आता या आमदाराला रोखण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी अक्षरशः धावाधाव सुरू केली आहे. अजित पवार दोन-दोन वेळा बीडला धावत आले तर आता स्वतः मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस सोमवारी बीडमध्ये सभा घेणार असून,




त्यांच्यासोबत पंकजा मुंडेही मैदानात आहेत.

विधानसभेच्या वेळीही हेच दृश्य होते. क्षीरसागर यांच्या पाठीशी ना कोणी मंत्री, ना मोठा नेता तरी त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना चिरडत विजय मिळवला. त्यांचे याच स्वतंत्र बळाचे वार पुन्हा हवेत घुमत असल्याची स्पष्ट चिन्हे आहेत. नगरपालिकेची निवडणूक टप्प्यावर येताच तुतारीचा निनाद एवढा दणदणीत झाला आहे की, विरोधकांनी कानावर हात ठेवण्याची वेळ आली आहे. क्षीरसागरांनी आखलेली रणनीती मैदानभर प्रभावी ठरताना दिसते आहे.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, पक्षनेते एवढी फौज एखाद्या नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी रस्त्यावर उतरली, हे बीडच्या राजकारणात प्रथमच घडत आहे. आणि त्याचे एकच कारण गर्दीतल्या आमदाराची ताकद सत्ताधाऱ्यांना झोप उडवणारी ठरत आहे. म्हणूनच एका नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी हे इतके हेवीवेट चेहरे बीडमध्ये फिरत असल्याचे दिसत आहे. मोठमोठ्या नेत्यांनी कितीही बीडमध्ये येऊन टिंग्या मारल्या तरी ३ डिसेंबरला मतपेट्या उघडल्या की 'तुतारी'चा आवाज किती दूरवर घुमला ते समोर येईल. पण सध्या तरी बीडमध्ये तुतारीच्या गजराने सत्ताधाऱ्यांची दमछाक झालेली दिसत आहे.

### एकटा आमदार विरुद्ध संपूर्ण सत्ता पण मैदानात निनाद फक्त तुतारीचाच !

आज हालत अशी आहे की, बीड शहरामध्ये कुठेही जा, चौकात, बाजारात, गल्लीमध्ये, वसाहतीत तुतारीचा आवाज हवेत ऐकू येतो.लोक म्हणताहेत, सरकार कितीही मोठं असो पण बीडमध्ये आमदारच मोठा.आमदार संदीप क्षीरसागरांनी नगरपालिकेसाठी स्वतंत्र रणनीती तयार केली आहे. त्यांनी पक्षाच्या वादांमध्ये अडकून न पडता तळागाळातील कार्यकर्ते, समाजघटक, सार्वजनिक संघटना आणि तरुणाईला स्वतःभोवती एकत्र केले आहे.त्यांच्या तंबूत लोकांचा इतका ओघ आहे की विरोधकांच्या सभा त्यापुढे पोकळ वाटू लागत आहेत. यामुळेच ३ डिसेंबरला मतमोजणी सुरू झाली की, राज्यभरात चर्चा होणार एका आमदाराने संपूर्ण सरकारला कसे नमवले ?

### जनताच देणार अहंकारी सत्तेला उत्तर

घोडा मैदान एकदम टप्प्यात आले असून याचा परिणाम ३ डिसेंबरला मोठा 'संदेश' देऊन जाईल. सध्या निर्माण झालेल्या चित्रानुसार बीडमध्ये फक्त नगरपालिका नाही, तर जनता सत्ताधाऱ्यांच्या अहंकाराला उत्तर देण्यासाठी उभी आहे. राजकारणात हे चित्र क्वचितच दिसते. एकटा आमदार विरुद्ध मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार, पक्ष संघटना. पण सध्याची हवा सांगते की, आवाज कुणाचा? तुतारीचाच...!

# प्रभाग १३ च्या कॉर्नर बैठकीला आले जाहीर सभेचे स्वरूप

## सय्यद अफसानाबी व उषा लांडगे यांचा विजय आजच निश्चित

माजलगाव (बातमीदार) नगर पालिकेची निवडणूक सद्या अंतिम टप्प्यात अली असून येथील प्रभाग १३ चा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अधिकृत उमेदवार सय्यद अफसानाबी सलीम व उषा अशोक लांडगे यांच्या प्रचारार्थ येथील आझाद नगर येथे एका कॉर्नर सभेचे आयोजन केले होते मात्र ही कॉर्नर बैठकीचे रूपांतर खूप मोठया जाहीर सभेत झाल्याने येथील दोन्ही उमेदवार आजच विजय झाल्याचे दिसून येत आहेत तर विरोधी उमेदवाराना या भागातील मतदार घराचा रस्ता दाखवणार असल्याचे सांगत आहेत




शहरातील अध्यक्ष व २६ नगर सेवका साठी दि २ डिसेंबर रोजी मतदान होत असून या पार्श्वभूमीवर काल शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी कडून प्रभाग १३ च्या उमेदवार व येथील सामाजिक कार्यकर्ते सय्यद सलीम बापू यांच्या सुविज्ञ पत्नी सय्यद अफसानाबी सलीम बापू व येथील तरुण शिक्षक बंधू अशोक लांडगे सर यांच्या पत्नी उषा अशोक लांडगे निवडणूकी साठी उभ्या आहे त्यांच्या प्रचारार्थ काल शहरातील आझाद नगर येथे सहाल चाऊस,बाबुराव पोटभरे ,नारायणराव डक ,श्रीहरी मोरे, सलीम बापू यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठक आयोजित केली होती मात्र या बैठकीचे रूपांतर एका भल्या मोठया जाहीर सभेत झाले या वेळी सहाल चाऊस यांनी आपले या भागावर विशेष लक्ष असून येथील गोरगरीब जाणतेच्या कल्याना साठी आपण आमचे शिफा बिलाल चाऊस या नगराध्यक्ष पदासाठी तर सय्यद अफसानाबी सलीम व उषा अशोक लांडगे यांना नगर सेवक पदासाठी आपण मतदान रुपी आशिर्वाद दावेत अशी विनंती केली तर बाबुराव पोटभरे यानी आपण कायम या भागासाठी आपल्या घराचे दरवाजे उघडे ठेवले आहेत लवकरच गौतम नगर मध्ये स्वखर्चाने एक भव्य पुतळा उभारू असा शब्द देत आम्हाला भरघोस मताची लीड देण्याचे आव्हान केले

काल झालेली जाहीर सभा (कॉर्नर बैठक) एवढी अफाट होती की दोन्ही उमेदवार बंपर मतांनी निवडून येतील

तर या सभेची विरोधाकानी चांगलीच धास्ती घेतली आहे त्यांना त्यांचा पराजय दिसत असल्याने ते खालच्या पातळीवर जाऊन टीका करत आहेत

# जय भवानी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र ग्रामीण बँक, पाटोदा येथे अभ्यास भेट



पाटोदा : सय्यद फयाज

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या अध्ययन उपक्रमांतर्गत पाटोदा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेला विद्यार्थ्यांनी अभ्यास भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बँकेचे दैनंदिन कामकाज, व्यवहार प्रक्रिया आणि रोजगाराच्या संधी याबाबत प्रत्यक्ष माहिती मिळवली.

विद्यार्थ्यांना बँकींग क्षेत्रातील विविध पदांच्या संधी, व्यवहाराची पद्धत, भविष्यकालीन रोजगारसंधी तसेच आर्थिक व्यवस्थापनाचे प्राथमिक ज्ञान मिळावे यासाठी महाविद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. वंदना जाधव यांनी हा उपक्रम राबविला.

या भेटीदरम्यान शाखा व्यवस्थापक श्री. शिंदे (एस. बी.) यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत बँकींग क्षेत्रातील उपलब्ध करिअरच्या संधी, आव्हाने आणि बदलत्या काळानुसार स्वावलंबी होण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच विविध ठेवी योजना, कर्जप्रकार आणि शाखेतील व्यवहार याबाबत सविस्तर माहिती दिली.यावेळी बँकेच्या श्रीमती पडवळ के. एस., श्रीमती चैताली कुसळकर आणि श्री. लक्ष्मण अंदुरे यांनीही बँकींग व्यवहाराबाबत विशेष मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

अभ्यासभेट यशस्वी होण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. सुनील जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ. बंडू लोखंडे आणि ग्रंथपाल श्रीमती रकटे जे. बी. यांचे सहकार्य लाभले.या आगळ्या-वेगळ्या उपक्रमात हिंदी विभागातील बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग नोंदवला असून बँकींग क्षेत्राची प्रत्यक्ष अनुभवसंपन्न माहिती मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.



# मस्साजोग संतोष देशमुख हत्याकांडाला एक वर्ष; तरीही न्याय रखडला, पँथर सेनेकडून तीव्र संताप

बीड : मस्साजोग संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येला आज (दि. ३० नोव्हेंबर २०२५) पूर्ण एक वर्ष पूर्ण झाले. तरीही या प्रकरणात न्याय मिळालेला नाही, फास्ट ट्रॅक कोर्ट कागदावरच आहे, चार्जफ्रेमही झालेली नाही आणि एक मुख्य आरोपी अजूनही फरार आहे, असा गंभीर आरोप ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने करण्यात आला. आज प्रथम पुण्यस्मरणानिमित्त बीड येथे आयोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी आणि कुटुंबीयांनी पुन्हा एकदा आक्रोश व्यक्त केला.सर्व पुरावे हजर असतानाही न्यायाला मुद्दाम भिजत ठेवले जात आहे. हे सुनियोजित षड्यंत्र आहे का? असा सवाल उपस्थित करत पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, आम्ही गेल्या एका वर्षात राज्यभर आंदोलने केली, रस्त्यावर उतरलो, आवाज उठवला; पण न्याय मिळाला नाही. कुटुंब आजही भयभीत आणि असुरक्षित आहे. न्याय मिळाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, शेवटपर्यंत लढा देऊ.ऍड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली, तरी प्रत्यक्षात प्रकरणाला गती मिळाली नाही, याकडे लक्ष वेधत पँथर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला. कार्यवाहीच्या नावावर फक्त इव्हेंटबाजी सुरू आहे, न्याय मात्र दिसत नाही. या राज्यात न्याय भिजवला जातोय, अशी भावना व्यक्त होत आहे.कार्यक्रमात स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी कुटुंबीयांचे सांत्वन करत दीपक भाई केदार यांनी पुन्हा एकदा कायम तुमच्या पाठीशी आहे आणि राहील अशी ग्वाही दिली.या प्रसंगी ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. दीपक भाई केदार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विनोद भोळे, प्रदेश प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, प्रदेश कार्याध्यक्ष अशोक घडवे, सुर्यकांत ठोकळ, वाशिम शेख, निलेश वाघमारे, गणेश चक्रे, प्रतिक वाघमारे, आकाश रोडे तसेच पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सोमनाथ सूर्यवंशीला न्याय नाही, संतोष देशमुखांना न्याय नाही न्याय मिळालाच पाहिजे, अशी घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# युवकांच्या उसळत्या जनसमुदायासमोर माजिद हुसैन यांची गर्जना!

## बीड हमारा गुरुर है, बीड हमारा जज़्बा है! बीडमध्ये एमआयएमची शक्तीप्रदर्शन सभा!

## आमदार माजिद हुसैन यांचे आक्रमक भाषणात विरोधकांवर तुफान प्रहार!

### युवकांचा प्रचंड प्रतिसाद, शहरात बाइक रॅलीने निर्माण केली 'धूम'!

### संघटन कौशल्याची चमक – जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ ठरले केंद्रबिंदू

एमआयएमच्या अलीकडील सभेत उमटलेली विक्रमी गर्दी ही केवळ भावनेची लाट नव्हे, तर जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक यांच्या संघटनात्मक कौशल्याची ठोस साक्ष मानली जात आहे. गेल्या एक वर्षापासून त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन केले, नवे कार्यकर्ते जोडले आणि पक्षाच्या विचारांची सातत्याने मांडणी करत जनतेशी थेट संवाद साधला. विशेषतः युवकांना संधी, जबाबदारी आणि दिशा देत त्यांनी शहरभरात सक्षम कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे तयार केले आहे. या सभेत दिसलेल्या शिस्तबद्ध उपस्थितीपासून ते वातावरण निर्मितीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शफिक भाऊंच्या संघटनात्मक नेतृत्वाचे दर्शन झाले. राजकीय विश्लेषकांच्या मते, 'ही गर्दी अचानक उसळलेली भावना नसून, सातत्य, संयम आणि जमिनीवरील कामाचे फलित आहे.' एमआयएमला मिळत असलेला जनसमर्थनाचा वाढता वेग हा शफिक भाऊंच्या नेतृत्वशैली, संवादकौशल्य आणि कार्यकर्त्यांच्या मनातील त्यांच्या प्रति असलेल्या विश्वासाचा स्पष्ट पुरावा आहे.



### युवकांचा प्रचंड प्रतिसाद, रॅलीत उसळला जल्लोष

आमदाराच्या सभेपेक्षा त्यांच्या आगमनानेच शहरात उत्साह निर्माण झाला होता. सकाळपासूनच युवक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. बाइक रॅलीमध्ये शेकडो नाही तर हजारो युवांनी सहभाग घेतला, ज्यामुळे काही ठिकाणी वाहतुकीची कोंडी निर्माण झाली.सभास्थळी पोहोचताच जयघोष, टाळ्यांचा आवाज आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.त्यांनी युवांना उद्देशून भावनिक शैलीत म्हटलं-बीड हमारा गुरुर है..

### मत खासदार ओवैसींना मिळतं – उमेदवारांना नाही

मागील निवडणुकीतील संदर्भ देत त्यांनी सांगितले की एमआयएम ला मोठ्या प्रमाणावर मत मिळाले होते, मात्र अल्प फरकाने काही जागांवर पराभव झाला. त्यांनी ठामपणे स्पष्ट केले-इथे मत उमेदवाराला नाही, असदुद्दीन ओवैसी यांच्या विचारधारेला मिळतं. त्यामुळे या वेळी पक्षनिष्ठा टिकवा आणि फितुरी करणाऱ्यांना दूर ठेवा.ते पुढे म्हणाले-या वेळी बीडमध्ये एमआयएम विजयी झाल्यावर मी पुन्हा येईन आणि आपल्या सोबत जल्लोष साजरा करेन.

बीड,(प्रतिनिधी) हैदराबाद येथील एमआयएमचे लोकप्रिय आणि दबंग आमदार माजिद हुसैन यांनी आज बीड शहरातील अडत मार्केट रोड आणि खासबाग परिसरात नगरपरिषद निवडणुकीतील एमआयएमच्या नगराध्यक्ष पदाच्या व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ भव्य प्रचारसभा घेतली. या सभेला युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे दृश्य संपूर्ण शहरभर दिसून आले.या वेळी एमआयएममहाराष्ट्र प्रदेश महासचिव समीर साजिद बिल्डर, एमआयएम बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक, निरीक्षक मंजुर साहेब, नगरसेवक मोहम्मद नसरोद्दीन साहेब यांच्यासह मजलिस चे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

विरोधकांवर जोरदार हल्ला –

आपल्या भाषणात बोलताना आमदार माजिद हुसैन यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. विशेषतः अजित पवार गटावर टीका करताना त्यांनी म्हटलं राष्ट्रवादी अजित पवार गटाला मत म्हणजे थेट भाजपला मत. कारण ते सत्तेत एकत्र बसले आहेत आणि मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन देतात.त्यांनी लोकांना आठवण करून दिली की भाजप सरकार वेळोवेळी मुस्लिम समाजावर अन्यायकारक निर्णय घेत आहे आणि त्याला अजित पवार गट व एकनाथ शिंदे गटाने पाठिंबा दिला आहे.

आवाहन – पतंग समोरचं बटन दाबा आणि एमआयएमला विजयी करा!

सभेच्या शेवटी त्यांनी सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे नागरिकांना आवाहन केले.

---

### क्षीरसागर मुक्त बीड के लिए घडी चाहिए

#### गुलामो को आज़ाद कराने के लिए घडी चाहिए

क्षीरसागर के कार्यकर्ते मुस्लिम पार्टीयो से इलेक्शन लढकर फिर क्षीरसागर के पास नही जायेंगे इसकी क्या गरंटी राज्य के उपमुख्यमंत्री और बीड के पालकमंत्री अजित पवार होने की वजह से बीड के विकास के लिए जादा से जादा बजेट मिल सकता है नगरपालिका मे सिर्फ बीड का सोचना है क्योंकि नाही ये असेंब्ली है और नाही संसद अगर बीड मे हम मुसलमान डिवाइड हो गये तो मरी हुई भाजपा क्षीरसागरो की वजह से ज़िंदी होगी

मै चाहता हु जो क्षीरसागरो ने मुस्लिम लिडरशिप मुस्लिम गुत्तेदारी और बिजनेस बीड मे खत्म करे वो फिर चाहे जयदत्त अण्णा क्षीरसागर हो भारतभुषण क्षीरसागर हो संदिप क्षीरसागर हो या योगेश क्षीरसागर हो सबका राजकारण बीड के मुसलमानों ने खत्म करना चाहिए और मुजीब भाई जैसा साफसुतरा चेहरा प्रेमलता पारवे के रुप मे हमको मिलता है तो सभी ने स्वागत करना चाहिए



### कडा पं. स. गणातून राम मधुरकर यांना उमेदवारी द्यावी- ग्रा.प.सदस्य आरिफ शेख,अमोल साळवे

कडा (प्रतिनिधी) राजकीय चर्तुळात बहुचर्चित असलेला कड़ा पंचायत समिती गण हा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव झाल्यामुळे या गणातून सर्वसमावेशक, लोक संपर्कात असलेले आ. सुरेश धस समर्थक कड्याचे माजी सरपंच राम मधुरकर यांना उमेदवारी देण्याची मागणी कडा ग्रामपंचायतचे सदस्य आरिफ शेख व अमोल साळवे यांनी केली आहे. आष्टी तालुक्यात राजकीय केंद्रबिंदू म्हणून परिचित असलेला कड़ा पंचायत समिती गण हा नुकताच ओबीसीसाठी राखीव झाल्यामुळे विविध राजकीय पक्षातील कार्यकत्यांची लगबग वाढली असली तरी ग्रामस्थांना निरुपद्रवी सर्वसमावेशक विकासाची दृष्टी लागलेल्या व्यक्तीमत्वाला कडेकर पसंती देण्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यामध्ये आ. सुरेश धस समर्थक तथा कड्याचे माजी सरपंच राम मधुरकर यांच्या नावाला अग्रगन्य पसंती मिळत आहे. मधुरकर यांनी यापूर्वी संजय गांधी निराधार, श्रावण बाळ या योजनेचे अध्यक्ष असल्यामुळे जवळपास दहा हजार गरजू लाभार्थींना त्यांनी मदत मिळून दिली. अशा लोकसंपर्कातील रात्री-अपरात्री सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून मधुरकर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी कडा ग्रामपंचायत सदस्य आरिफ शेख आणि अमोल साळवे यांनी केली आहे.

## वृक्षारोपणाच्या योजना फक्त कागदावरच? - लावली लाखोंनी, जिवंत एकही नाही!

### जंगल-गायरानातील आणि सार्वजनिक ठिकाणच्या झाडांची धोक्यात जीवरेखा

प्रशासन बघ्याच्या भूमिकेत – कारवाई शून्य:- डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व रामनाथ खोड

बीड – पर्यावरण संरक्षणाच्या नावाखाली शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून वृक्षलागवड मोहिमा राबवल्या जातात. कागदोपत्री लाखो रोपे लावली गेल्याचे दाखले असतात. मात्र प्रत्यक्षात ना ती रोपे दिसतात, ना झाडे; उलट बिनधास्त वृक्षतोड मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. प्रशासनिक निष्काळजीपणा आणि संगनमतामुळे जिल्ह्यातील पर्यावरण संतुलन गंभीर धोक्यात आला असल्याची तीव्र प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी व्यक्त केली आहे.

३३ कोटी वृक्षलागवड – बीडमध्ये एकही जिवंत झाडाचा लेखा उपलब्ध नाही!



राज्य शासनाची गाजलेली ३३ कोटी वृक्षलागवड मोहीम बीडमध्येही मोठ्या प्रचारासह राबवण्यात आली. लाखो रोपे लावल्याचे दाखवे तयार झाले, निधी खर्च झाला.परंतु या मोहिमेत लावलेल्या झाडांपैकी एकही झाड जिवंत किंवा अस्तित्वात पाहायला मिळत असल्याचा ठोस पुरावा प्रशासनाकडे नाही.ही परिस्थिती पाहता वृक्षलागवड मोहिमेची पारदर्शकता, निधीचा वापर आणि अधिकाऱ्यांची जवाबदारी यांच्यावर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहतो.

वृक्षारोपण फोटोसेशनपुरतेच – निगा नाही, जवाबदारी नाही

अनेक सामाजिक संस्था, प्रतिष्ठान आणि क्लब मोठ्या उत्साहात वृक्षलागवड कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर टाकतात.मात्र त्या रोपांची नंतर निगा, संरक्षण, पाणीपुरवठा किंवा सर्व्हायव्हल रेट यांच्याकडे कोणीही लक्ष देत नाही.अधिकाऱ्यांशी जवळीक साधून सामाजिक कार्याचा मुखवटा घालून स्वतःचे स्वार्थ जोपासण्याचा प्रकार खुलेआम सुरू असल्याचे दिसते.

---

## बार्शी नाका वॉर्ड क्र. २६ अ मध्ये 'कामाच्या' माणसाला पसंती: गोरख काळे यांच्या नेतृत्वावर मतदारांचा विश्वास !

बीड (प्रतिनिधी) बार्शी नाका बीड आगामी केला जात आहे. नगरसेवक निवडणुकीत वॉर्ड क्रमांक २६ अ मध्ये वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. येथील नागरिकांमध्ये गोरख काळे यांच्या कामाची पद्धत आणि सर्वसामान्यांसाठी धावून येण्याच्या वृत्तीमुळे एक सकारात्मक चर्चा रंगली आहे.

गोरख काळे हे या वॉर्डातून नगरसेवक पदासाठी उमेदवार असून, त्यांच्या विरोधात असलेले 'धनदांडगे' उमेदवार असूनही, मतदार मात्र 'कामाचा माणूस' म्हणून काळे यांना पसंती देत असल्याचे बोलले जात आहे. 'दामाचे' लोक नकोत, 'कामाचा' माणूस हवा वॉर्डात सध्या मतदारांमध्ये एकच चर्चा ऐकायला मिळत आहेः आम्हाला पैशाने धनदांडगे असणारे लोक नकोत. आम्हाला गोरगरीबांच्या मदतीला धावून येणारा आणि त्यांच्या कामांना पडणारा, कामाचा माणूस पाहिजे.

गोरगरीब जनतेला आपला वाटणारा चेहरा म्हणून गोरख काळे यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांचा अनेक वर्षांचा वार्डमधील कामांचा अनुभव



आणि युवकांमध्ये असणारी त्यांची प्रतिमा यामुळे ते मोठ्या मतांनी विजयी होतील, असा विश्वास व्यक्त

नम्रता आणि तत्परतेची वेगळी ओळख गोरख काळे यांची ओळख एक नम्र आणि तत्परतेने काम करणारा माणूस अशी आहे. कोणत्याही गोरगरीब जनतेचे काम असो, ते अगदी पोटतिडकेने सोडवणारे सामान्य जनतेच्या मनातील नेते म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या कामाची पद्धत आणि तत्परता वॉर्डातील नागरिकांनी अनेकदा अनुभवली आहे. राजकारण कमी आणि समाजकारण जास्त करण्यावर गोरख काळे यांचा भर असतो. ते कोणत्याही जाती धर्माचा विचार न करता हिंदू, मुस्लिम, दलित अशा सर्व समाजाच्या सुख-दुःखात अग्रस्थानी राहून सहभागी होतात. त्यामुळे निवडणुकीत ही वेगळी प्रतिमा निश्चितच त्यांच्यासाठी निर्णायक ठरेल.

युवा नेतृत्व म्हणून पाहिले जाणारे गोरख काळे हे त्यांच्या समाजकारणाच्या कामामुळे प्रचंड मतांनी विजयी होतील, यात शंका नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यांचे जनसंपर्काचे जाळे आणि कामाची आवड त्यांना विजयाच्या जवळ घेऊन जाईल, असे मत मतदार व्यक्त करत आहेत.

अहोरात्र जनसेवेत असणारे गोरख नवनाथ काळे यांना चांगला प्रतिसाद!

गोरख नवनाथ काळे हे त्यांच्या अविरत जनसेवेमुळे लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरले आहेत. त्यांचे काम कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवता गरजूंपर्यंत पोहोचत असल्याने त्यांना नागरिकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे.

काम कुठलेही असो, गोरख नवनाथ काळे यांना फक्त एक फोन करण्याची गरज आहे आणि ते तत्काळ मदतीसाठी हजर होतात. त्यांची ही तत्परता आणि संकटात धावून जाण्याची वृत्ती लोकांना खूप दिलासा देणारी आहे.

लोकांच्या सार्वजनिक जीवनात येणाऱ्या छोट्या-मोठ्या अडचणींमध्ये गोरख काळे हे नेहमीच आधारवड म्हणून उभे राहतातः

कोणाचे दुखणे असो, किंवा दवाखान्यात जाण्याची गरज असो, गोरख काळे लगेच मदत करतात. पोलीस स्टेशन संबंधित कामांमध्येही ते लोकांना त्वरित मदत पुरवतात.नम्रता आणि तत्प्रतेची वेगळी ओळख म्हणजे गोरख काळे

### चार वर्षीय ज़िकरा ज़ाकेर शेख अरबी मध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

बीड (प्रतिनिधी) - शहरातील प्रसिद्ध अंबर फॅमिली रेस्टॉरंट चे संचालक ज़ाकेर शेख यांची चार वर्षीय कन्या ज़िकरा ही अरबीमध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाली. याबद्दल तिचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

ज़िकरा शेख अरबी भाषेतून शिक्षण घेत आहे. नुकतीच तिची परीक्षा झाली. यात तिने चांगले गुण घेतले. परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व विद्यार्थिनींना कारंजा मस्जिद येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात हाफ़ीज़ साद यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यात ज़िकरा ज़ाकेर शेख हिचे ही स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिक्षक वृंदांसह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---




## प्रभाग १० मध्ये लोक विकास महाआघाडीच्या 'कपबशी'ला जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद

### नगरसेवक पदासाठीचे उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांना मिळतेय जनतेची पसंती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

लोक विकास महाआघाडीचे अंबाजोगाई नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेऊन झंझावाती प्रचार केला. प्रभागातील आपले सहकारी प्रभाग क्रमांक १० मधील लोक विकास महाआघाडीचे ओबीसी (महिला) उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांना सोबत घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत आशीर्वाद घेतले. जागोजागी पापा मोदींच्या 'कपबशी'ला जनतेतून मोठी पसंती व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याचे व मतदानरूपी आशिर्वाद देण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी केले आहे. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १० मधील लोक विकास महाआघाडीचे ओबीसी (महिला) उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांच्यासह शहराध्यक्ष मुख्तार (चाचू) शेख, शहर उपाध्यक्ष रशीदभाई सय्यद, भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले, माजी पाणीपुरवठा सभापती अमोल लोमटे, माजी नगरसेवक अशोक मोदी, हाजी खालेक साहब, खालेदभाई चाऊस, महेंद्र निकाळजे, सुनिल जगताप, राजेश परदेशी, फहेमीद फारूखी (नन्हा), ॲड.दयानंद लोंढाळ, ॲड.विलास लोखंडे, अशोक पालके, धिमंत राष्ट्रपाल यांच्यासह प्रभागातील अनेक युवा सहकारी सोबत होते.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com